मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक २७५ वा ● सोमवार, ता. ३१ मार्च २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

रयत समाचार पोर्टल
Scan QR Code

रयत समाचार चॅनल
Scan QR Code

इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी
Scan QR Code

# मशिदीत ब्लास्ट करणाऱ्या दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करावी- फैय्याज इनामदार

## अन्यथा लोकशाही मार्गाने जनआंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील अर्धमसला येथील मस्जिदमध्ये जिलेटीनने ब्लास्ट करून मस्जिद उडवण्याचा प्रयत्न केला. तलवाडा पोलिसांनी कारवाई करून दोन दहशतवाद्यांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करीत आहे. हे दहशतवादी कृत्य अत्यंत संतापजनक आणि निषेधार्ह आहे, असे संतापजनक उद्गार फैयाज इनामदार यांनी काढले. अधिक माहिती देताना इनामदार यांनी सांगितले.



२९ तारखेला रात्री गावात संदल असताना आरोपी विजय रामा गव्हाणे व श्रीराम अशोक सागडे हे संदलीमध्ये मुस्लीम समाजाचे लोकांना उद्देशून जातीवाचक शिवीगाळ करून तुमचे येथे काय काम आहे असे म्हणुन शिवीगाळ करीत होते आणि म्हणत होते की, इथे मस्जिद कशाला बांधली ती पाडून टाका नाहीतर आम्ही पाडू.

यावेळी गावातील सरपंच व इतर नागरिकांनी त्यांची समजूत काढून परत पाठवले. ३० तारखेच्या पहाटे त्यांनी मशिदीत ब्लास्ट घडवून आणला. ही घटना Unlawful Activities (Prevention) Act. (UAPA)मधे बसत नाही का? हा अटॅक असल्याने प्रशासनाने स्वतः फिर्यादी होणे गरजेचे होते, पण यात प्रशासनाने का फिर्याद दाखल केली नव्हती? असा खडा सवाल इनामदार यांनी विचारला आहे. फैयाज इनामदार यांनी मागणी केली आहे की, पोलिसांनी दहशतवाद्यांकडे स्फोटक साहित्य कुठून आले याची चौकशी करून या घटनेमागे अजुन कोण आहेत हे समोर आणले पाहिजे ? २९ तारखेला जे झाले त्याची कल्पना स्थानिक पोलिसांना नव्हती का? जर होती तर ही घटना कशी घडली? अजुनही, कायद्यांतर्गत गुन्हा का दाखल केला नाही ? तो लवकरात लवकर करावा. दहशतवाद्यांचे नार्को टेस्ट करून हे संघटित गुन्हेगारीसारखे प्रकरण आहे का याची चौकशी करावी. आरोपी कोणत्या संघटनेशी निगडीत आहे हे पहावे.

मागे घटसावळीत पण अशीच घटना घडली होती नंतर या प्रकरणात काय झाले सर्वांना माहीत आहे. बीड पोलिसांनी या दहशतवाद्यांना कठोर कारवाई करून यांच्यावर अंतर्गत कारवाई करावी अन्यथा लोकशाही मार्गाने याविरोधात जनआंदोलन करू असा इशारा इनामदार यांनी दिल.

१ एप्रिल २०२५ पासून पुर्णवेळ आपल्यासेवेत...
श्रीलक्ष्मी
होमिओपॅथिक क्लिनिक
डॉ. विद्या गायकवाड | 7588092673
वेळ : सकाळी ११ ते दुपारी ३, संध्याकाळी ५ ते रात्री ९
पत्ता : दर्पण बिल्डिंग, श्रीपाद मेडिकलच्यावर, शनी-मारुती मंदिराशेजारी, दिल्लीगेट वेशीच्या बाहेर, अहिल्यानगर-४१४००१
कृपया, फोन करुन येणे
सर्व आजारांवर होमिओपॅथिक औषधोपचार केले जातील
आजाराचे निदान व समुपदेशन केले जाईल

# स्वामी जयंतीनिमित्त आरोग्यचिकित्सा शिबीर

## गणेश क्रीडा मंडळाची २३ वर्ष निस्वार्थ समाजसेवेची परंपरा

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

गणेश क्रीडा मंडळ आणि ओम काळभैरव चॅरिटेबल फाऊंडेशन, गॅलेक्सी हॉस्पीटल, वडाळा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी जयंतीनिमित्त भव्य मोफत आरोग्य चिकित्सा शिबिराचे आयोजन शनिवारी ता.२९ मार्च रोजी टाटा मिल्स कंपाऊंड, परेल येथे करण्यात आले. या उपक्रमांतर्गत ई.सी.जी., डायबिटीस, ब्लड प्रेशर, नेत्र चिकित्सा तसेच हृदयरोग, नेत्ररोग, मूत्रपिंड आणि ऑर्थोपेडीक विभागातील तपासण्या करण्यात आल्या. तसेच या शिबिरात गरजू रुग्णांसाठी मोफत औषध वितरणही करण्यात आले.

ओम काळभैरव चॅरिटेबल फाऊंडेशन गेल्या ६ वर्षांपासून समाजसेवेत कार्यरत असून आतापर्यंत १०० हून अधिक आरोग्य शिबिरे आयोजित करून ११,००० हून अधिक नागरिकांना मदतीचा हात दिला आहे. शिबिरात प्रसिद्ध कर्करोगतज्ज्ञ डॉ. मिनी संगनेरिया यांनी महिलांना कर्करोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि वेळेवर निदानाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करून तपासणी केली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सुप्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. वैशाली शेलार, विजय कक्कड यांनी मोलाचे सहकार्य केले.

तसेच ओम काळभैरव चॅरिटेबल फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेंद्र वोरा, खजिनदार कांतीलाल वाढेल आणि समाजसेवक देवेंद्र मादेसर यांच्या प्रयत्नांसह गॅलेक्सी हॉस्पीटल, वडाळा येथील तज्ज्ञ डॉक्टर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा बहुमूल्य सहभाग लाभला. प्रतिक्षा पंकज फाटक, वैशाली साहा, अनुराधा शेंडे, जयवंती



भोसले तसेच गणेश क्रीडा मंडळाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी गणेश क्रीडा मंडळ, टाटा मिल्स कंपाऊंड, परेल यांचे प्रमुख पदाधिकारी देवेंद्र केळुस्कर, कमलाकर केळुस्कर, पंकज फाटक, सुनिल अडसूळकर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुरुदत्त वाकदेकर यांनी केले. गणेश क्रीडा मंडळाच्या २३ वर्षांच्या सामाजिक कार्याचा हा उपक्रम यंदाही उत्साहात पार पडला. रहिवाशांचा मिळालेला भरभरून प्रतिसाद हीच या सेवेची खरी पावती आहे.

# सुदर्शन खडांगळे यांना 'कार्यगौरव पुरस्कार' जाहीर

## 'पल्याड' चित्रपट अमेरिकेच्या फोर्ब्स मासिकापर्यंत पोहोचणारा पहिला मराठी चित्रपट

**कोपरगाव । किसन पवार**

महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळ उत्तर अहिल्यानगर आणि समता पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य 'कार्यगौरव पुरस्कार' सोहळ्याचे आयोजन शिर्डी येथे करण्यात आले असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. नाभिक समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना या सोहळ्यात सन्मानित करण्यात येणार आहे. यंदाचा 'कार्यगौरव पुरस्कार' मराठी चित्रपट लेखक-दिग्दर्शक सुदर्शन खडांगळे यांना जाहीर करण्यात आला असून हा पुरस्कार भाजपचे युवा नेते तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे, दैनिक लोकआवाजचे संपादक विठ्ठल लांडगे, योगेश शिंदे, जिल्हाध्यक्ष नाभिक महामंडळ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सुदर्शन खडांगळे यांनी कला, चित्रपटसृष्टी क्षेत्रात एक आगळीवेगळी ओळख निर्माण केली असून लहानपणापासूनच कला क्षेत्राची आवड असलेल्या सुदर्शन खडांगळे यांनी अनेक नाट्य आणि एकांकिकांमधून आपली कला सादर केली आहे. आपल्या वडिलोपार्जित सलुन व्यवसायाच्या वर्तुळातून बाहेर पडून, त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. कोपरगाव येथील रहिवासी असलेल्या सुदर्शन खडांगळे यांनी मास कम्युनिकेशन आणि व्हिडिओ प्रोडक्शन या क्षेत्रात पुणे विद्यापीठातून पदवी प्राप्त केली



२०१४ मध्ये त्यांनी अहमदनगर न्यू आर्ट्स कॉलेजमधून शिक्षण पूर्ण केले त्यांनी हिंदी चित्रपट ''मेरिट ऍनिमल'' मध्ये असिस्टंट डायरेक्टर म्हणूनही कार्य केले आहे, ज्यामुळे त्यांचा अनुभव फक्त मराठी नव्हे, तर हिंदी चित्रपटसृष्टीतही विस्तारला आहे त्यांचा ''पल्याड'' हा चित्रपट अमेरिकेच्या फोर्ब्स मासिकापर्यंत पोहोचणारा पहिला मराठी चित्रपट ठरला या चित्रपटाची नोंद फोर्ब्सने आपल्या अंकात घेतली असून, यापूर्वी कोणत्याही भारतीय चित्रपटाने, वेब सिरीजने किंवा मराठी सिनेमाने अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय पातळीवर मजल मारलेली नव्हती ''पल्याड'' चित्रपटाला अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले असून, तो विविध देशांमध्ये प्रदर्शित देखील करण्यात आला आहे यानंतर सुदर्शन खडांगळे यांनी ''माझा ज्ञानोबा'' ही टेलिव्हिजन मालिका साकारली, जी प्रेक्षकांच्या मनावर गारूड करू शकली.

ज्ञानेश्वर महाराजांचा जीवनप्रवास तंतोतंत आणि प्रभावीपणे मांडण्याचे कठीण कार्य त्यांनी अत्यंत यशस्वीरित्या पार पाडले सध्या देखील त्यांचे अनेक चित्रपट आणि टीव्ही मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येण्याच्या तयारीत आहेत तसेच पुरस्काराची घोषणा होत असतानाच, सुदर्शन खडांगळे यांनी त्यांच्या आगामी २०२५ च्या चित्रपट प्रोजेक्टबाबत महत्त्वाची माहिती उघड केली आहे आमच्या प्रतिनिधीशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, त्यांच्या नव्या चित्रपटात नवोदित आणि होतकरू कलाकारांना मोठी संधी दिली जाणार आहे.

खंडागळे पुढे म्हणाले की, ''नव्या कलाकारांना व्यासपीठ देणे गरजेचे'' आहे .''मराठीत अनेक प्रतिभावान कलाकार आहेत, पण त्यांना योग्य संधी मिळत नाही. माझ्या नव्या चित्रपटात मी अशा नवीन चेहऱ्यांना, त्यांच्या कौशल्याला संधी देणार आहे. मराठी सिनेमाच्या भविष्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय असेल.'' या चित्रपटाची अधिकृत घोषणा लवकरच होणार असून, नवोदित कलाकारांसाठी ही सुवर्णसंधी असणार आहे. त्यामुळे मराठी सिनेसृष्टीत करिअर करू इच्छिणाऱ्या युवा कलाकारांनी या प्रोजेक्टकडे नक्कीच लक्ष ठेवायला हवे. सर्व नाभिक बांधवांनी या सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# ईद-उल-फित्र : एक पवित्र सण

ईद-उल-फित्र, जी सामान्यतः रमजान ईद म्हणून ओळखली जाते, ही इस्लाम धर्मातील एक महत्त्वपूर्ण आणि आनंदाची उत्सव आहे. हा सण रमजान महिन्याच्या समाप्तीनंतर साजरा केला जातो आणि संपूर्ण महिनाभर उपवास (रोजा) पूर्ण केल्यानंतर मुस्लिम समाज हा आनंदोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतो.




ईद-उल-फित्रचे महत्त्व

ईद-उल-फित्रचा अर्थ ''उपवासाची समाप्ती करणारा सण'' असा होतो. हा दिवस संयम, भक्ती, सेवा आणि समाजातील गरीब व गरजू लोकांसाठी दानधर्म करण्याचे प्रतीक मानला जातो. मुस्लिम बांधव रमजान महिन्यात रोजा ठेवून उपासना करतात आणि ईदच्या दिवशी अल्लाहचे आभार मानतात की त्यांनी हा पवित्र महिना पूर्ण करण्याची शक्ती दिली.

ईद-उल-फित्रचा सण कसा साजरा केला जातो?

१. चंद्र दर्शन: रमजान महिना इस्लामिक हिजरी कॅलेंडर नुसार २९ किंवा ३० दिवसांचा असतो. ईदच्या तारखेची निश्चिती शाव्वाल महिन्याच्या चंद्रदर्शनावर होते.

२. सकाळी विशेष प्रार्थना (नमाज): ईदच्या दिवशी सकाळी विशेष ईदची नमाज अदा केली जाते. मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने मशिदी किंवा ईदगाहमध्ये एकत्र येतात.

३. सद्कत-उल-फित्र (दान): ईदच्या दिवशी गरीब आणि गरजू लोकांना आर्थिक मदत दिली जाते, याला सद्कत-उल-फित्र म्हणतात. प्रत्येक कुटुंबाने त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात दान करणे बंधनकारक असते.



सलीमखान पठाण
श्रीरामपूर
९२२६४०८०८२

**प्रासंगिक**

४. आप्तस्वकीयांची भेट आणि सद्भावना: लोक एकमेकांना ''ईद मुबारक'' म्हणत शुभेच्छा देतात. घरोघरी मिठाई व खास पदार्थ बनवले जातात.

५. गोडधोड पदार्थ शिरखुर्मा: ईदच्या दिवशी खास पारंपरिक गोड पदार्थ शिरखुर्मा बनवला जातो, जो दूध, साखर, खजूर आणि सुका मेवा यांच्यापासून तयार होतो. ईदचा सामाजिक आणि धार्मिक संदेश ईद-उल-फित्र हा केवळ आनंदाचा सण नसून मानवता,एकता आणि परोपकाराचे प्रतीक आहे. या दिवशी लोक प्रेम, आपुलकी आणि माफ करण्याचा संदेश देतात.

हा सण गरीब-श्रीमंत, लहान-मोठा यामधील भेदभाव मिटवतो आणि सर्वांना समानतेचा अनुभव देतो. रमजान ईद हा इस्लाम धर्मातील एक पवित्र आणि मंगल सण आहे, जो केवळ उत्सव नाही तर एक आध्यात्मिक आणि सामाजिक शिक्षणही देतो. हा सण संयम, दानधर्म, बंधुत्व आणि प्रेम यांचा उत्सव आहे. ईद हा केवळ एक दिवसाचा सण नसून, तो माणुसकी आणि सामंजस्याचा संदेश देणारा एक सुंदर पर्वणीचा दिवस आहे. ईद मुबारक!

# अलविदा अलविदा ए माहे रमजान नव्हे, अलविदा ए इन्सान

## कारी इरफान यांचे बयान

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

अत्यंत महत्त्वाची शब ए कद्र हर्षो ल्हसात पार पडल्यानंतर आता केवळ रमजान ईदच्या चंद्राची प्रतीक्षा उरली आहे. सर्वत्र ईदची अत्यंत जलद तयारी सुरू झाली असून ईदच्या चंद्राची आता सर्वांना डोहाळे लागले आहे. गेली महिनाभर रमजान या पवित्र महिन्याचे सर्वांनीच पावित्र्य राखत अतिशय सुखद भावनेने या महिन्याचे पालन केले. रमजान महिना संपण्यासाठी आता एक दोन दिवस उरले असल्याने मुस्लिम बांधव परोपकार तसेच सेवाभाव जपण्यासाठी आता मिळणार नसल्याची भावना त्यांच्या मनात घोंगावत आहे. महिला आबालवृद्ध आणि बालकही हा रमजान महिना संपत असल्या कारणाने दुःख व्यक्त करीत आहेत. जकात, फितरा यासाठी आता सर्व मुस्लिम बांधव आपापल्या परीने त्याची वाटणी करत आहेत. विधवा, परित्यक्ता अनाथ अशांना जकात आणि फितरा देण्यात येतो.



शफीक बागवान
श्रीरामपूर
९८६०४ ००६८५

**समाजवार्ता**

### अलविदा ये इन्सान...

**'अलविदा अलविदा या माहे रमजान नव्हे अलविदा अलविदा इन्सान ' या वैजापूर येथील कारी इरफान यांच्या बयानमुळे अनेकांच्या डोळ्यात अश्रू तरळले. मस्जिद रहमत ए आलम येथे शुक्रवार निमित्त आयोजित बयान मध्ये त्यांनी रमजान आणि त्याचे महत्त्व अत्यंत बारकाईने आणि स्पष्ट शब्दात उलगडून सांगताच अनेकांना गहिवरून आले. रमजान महिना हा अलविदा होऊ शकत नाही, असे सांगत असताना प्रत्येक माणूस हा अलविदा आहे. माणूस आज आहे तर उद्या नसेल मात्र रमजान महिना हा कायम राहणार आहे, रमजान महिन्याचे पावित्र्य हे आयुष्यभरासाठी आहे. ते केवळ एका महिन्यापूरते या महिन्याचे महत्व नसल्याचे त्यांनी उलगडून सांगताच मशिदीतील नमाज पडणारे बांधव अतिशय भावना विवश झाले. माणूस श्रीमंत असला तरी त्यात नम्रपणा असायला हवा. अल्लाह ने जे सांगितले आहे तेच करा त्यात भले आहे.**

मनात सेवाभाव आणि परोपकार नसेल तर माणूस कितीही श्रीमंत असेल त्याची कोणतीही देणगी तसेच इतर गोष्ट अल्लाह कबूल करत नाहीत. गरीब अनाथांबद्दल प्रत्येक मुस्लिमांच्या मनात आदर असेल तरच पुण्य कर्म कबूल होत असल्याचे वैजापूर येथील कारी इरफान यांनी आज मस्जिद रहमत ए आलम येथे सांगितले.

# नववर्षाची सुरुवात महिलांच्या हस्ते गुढी उभारुन

## उन्हाळ्यात पक्षी वाचविण्यासाठी धान्य व पाण्याची केली सोय

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सामाजिक क्षेत्रात योगदान देवून आरोग्य व पर्यावरण चळवळ चालविणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने रविवारी (ता.३० मार्च) स्थापना दिन रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सामाजिक कार्याची गुढी उभारली. वाढत्या उन्हाळ्यात पक्ष्यांचे जगणे सुसह्य व्हावे म्हणून भिंगार येथील भगवान गौतम बुध्द जॉगिंग पार्क मधील वृक्षांवर प्लास्टिकचे भांडे अडकवून पक्ष्यांसाठी धान्य व पाण्याची सोय करण्यात आली.



मराठी नववर्षाची सुरुवात महिलांच्या हस्ते गुढी उभारुन वृक्षारोपण मोहिम राबविण्यात आली. तर यावेळी स्वच्छता अभियान देखील राबविण्यात आले.

हरदिन मॉर्निंग ग्रुपला २५ वर्ष पूर्ण होवून रौप्य महोत्सवी वर्षाची सुरुवात ग्रुपच्या सदस्यांनी सामाजिक उपक्रमांनी सुरुवात केली. तर आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक चळवळ चालविताना वर्षभर ग्रुपच्या माध्यमातून सातत्याने कार्य सुरु आहे. प्रारंभी जॉगिंग पार्क मधील भगवान गौतम बुध्द यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन योगा, प्राणायामने पहाटेची सुरुवात झाली. जॉगिंग पार्कच्या हिरवळीवर नागरिकांनी योग, प्राणायाम केला. भारती कटारिया, सुरेखा आमले-शिवगुंडे, प्रांजली सपकाळ, उषा ठोकळ, संगीता सपकाळ, मीरा मुळे, डॉ. सीता भिंगारदिवे, आशा पराते, अदिती मेहेत्रे, सुनीता चव्हाण, सुवर्णा महागडे-भिंगारदिवे, चंद्रकला रासणे, भाग्यश्री मुनोत, कांताबाई स्वामी या महिलांच्या हस्ते गुढी उभारण्यात आली. तर उद्यान परिसरात महिलांनी विविध प्रकारच्या रोपांची लागवड केली. दिवसं-दिवस उन्हाची तीव्रता वाढत असताना अधिकाधिक तापमानाची नोंद होत आहे. पक्षी पाण्यासाठी व अन्नासाठी भटकंती करीत आहे. वाढत्या तापमानात पिण्यासाठी पाणी मिळत नसल्याने अनेक पक्ष्यांना जीव गमवावा लागत आहे. ही जाणीव ठेऊन ग्रुपच्या सदस्यांनी उन्हाळ्यात वाढत्या तापमानात पक्ष्यांना वाचविण्यासाठी झाडाला धान्य व पाण्याची भांडी टांगण्यात आली. ग्रुपच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त नागरिकांना मिठाईचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सीए रविंद्र कटारिया, सीए श्रेयांश कटारिया, रमेश वराडे, संतोष ताठे, रतन मेहेत्रे, सर्वेश सपकाळ, मेजर दिलीप ठोकळ, सचिन चोपडा, जहीर सय्यद, अभिजीत सपकाळ, दीपक धाडगे, मनोहर दरवडे, सुधीर कपाळे, हभप ज्ञानेश्वर महाराज अनावडे, अशोक पराते, ईवान सपकाळ, दीपक घोडके, महेश सरोदे, दिलीप गुगळे, विकास भिंगारदिवे, सरदारसिंग परदेशी, प्रकाश देवळालीकर, अविनाश जाधव, सुभाष पेंढुरकर, विठ्ठल (नाना) राहिंज, अनिल सोळसे, मुन्ना वाघस्कर, राजू कांबळे, सूर्यकांत कटोरे, सुधाकर झांबरे, शेषराव पालवे, विलास आहेर, कन्हैय्या परदेशी, सुंदर पाटील, कुमार धतुरे, बंडू बेद्रे, नामदेव जावळे, रामनाथ गर्जे, सिताराम परदेशी, अतुल मुनोत, राजू शेख, प्रशांत चोपडा, शिवांश शिंदे, विशाल भामरे, अनिल हळगावकर, योगेश चौधरी, संजय शिंगवी आदी उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने वर्षभर योग, प्राणायामच्या माध्यमातून आरोग्य चळवळ व वृक्षारोपण संवर्धन करुन पर्यावरण संवर्धन चळवळ चालवली जाते.

तसेच विविध सामाजिक उपक्रमातून गरजूंना आधार देण्याचे काम केले जात आहे. मोफत आरोग्य, नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर घेवून आणि समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा पुरवून आधार दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

सीए रविंद्र कटारिया यांनी पशुसेवा ही ईश्वरसेवाच आहे. मुक्या प्राण्यांना दया दाखविणे हे प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य आहे. सामाजिक संवेदनेतून पाडव्याच्या मुहूर्तावर हरदिनने राबविलेला उपक्रम दिशादर्शक आहे. तसेच वर्षभर ग्रुपच्या माध्यमातून सुरु असलेली सामाजिक चळवळ प्रेरणादायी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सचिन चोपडा यांनी मागील चोवीस वर्षापासून ग्रुपच्या माध्यमातून अविरतपणे सामाजिक कार्य सुरू असून, विविध सण, उत्सव सामाजिक उपक्रमाने साजरे करण्यात येतात. हा ग्रुप सर्वांसाठी एक परिवार बनला असल्याचे सांगितले.



# स्वामी समर्थ मंदिरात गुरुलीलामृत पारायण सुरू

**अहमदनगर । विजय मते**

सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवरील सावली सोसायटी मधील श्री. अक्कलकोट निवासी वटवृक्ष श्री.स्वामी समर्थ सेवा संस्था आयोजित मंदिरात ३१ मार्च रोजी श्री.स्वामी समर्थ महाराजांचा प्रकट दिन उत्सव साजरा होत असून यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमात शुक्रवार ता.२८ रोजी सामुदायिक श्री.गुरुलीलामृत पारायणास . दुपारी साडेबारा वाजता विधिवत पूजा होऊन प्रारंभ झाला.३दिवस या पारायण सोहळ्याचे पौराहित्य निखिल देवरे गुरुजी करीत आहेत.साडे १२ते साडे ३ पर्यंत पारायण होणार आहे.या सोहळ्या मध्ये असंख्य महिलांनी सहभाग घेतला असून पारायण सोहळा ऐकण्याचा लाभ भाविक घेत आहेत. रविवार ता.३० मार्च रोजी गुढीपाडव्याला पहाटे ५ वाजता अभ्यंग स्नान, सकाळी ८ वाजता आरती, दुपारी १२ वाजता नैवेद्यआरती,सायंकाळी ७ वाजता धुपारती होऊन सायंकाळी साडेसात वाजता अनिरुद्ध धर्माधिकारी ह्यांचा अभंग वर्षा हा भक्ती गीतांचा कार्यक्रम होणार आहे. सोमवार ता. ३१ मार्च रोजी प्रकट दिनानिमित्त पहाटे ५ वाजता श्रींना रुद्राभिषेक सकाळी ८ वाजता आरती, दुपारी साडेबारा वाजता नैवेद्यआरती दुपारी१ते ३महाप्रसादाचा कार्यक्रम होइल. सायंकाळी ६ वाजता श्री.स्वामी समर्थ महाराजांच्या उत्सव मूर्ती व पादुकांची भव्य अशी रथ मिरवणूक निघणार आहे.सायंकाळी ९वाजता आरती, रात्री १० वाजता शेजारती होऊन उत्सवाची सांगता होईल. तरी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. दर्शनाचा, कार्यक्रमाचा, महाप्रसादाचा लाभ घ्यावा. असे आवाहन सेवा संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिंदगी मिलेंगी फिरसे दोबारा : अवयवदान जागृतीला देणार नवाप्रकाश- डॉ. पवार

## डॉक्टर, केमिस्ट, सामाजिक संघटना प्रतिनिधींचा अवयवदानसाठी एकजुटीने कार्य करण्याचा संकल्प

**अहमदनगर । प्रतिनिधी**

द फेडरेशन ऑफ ऑर्गन ॲण्ड बॉडी डोनेशन अहिल्यानगर शाखा व फेडरेशन ऑफ मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह असोसिएशन ऑफ इंडिया (एफएमआरआय) यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्रदान अवयदान व देहदान या चळवळीला गती देण्यासाठी जनजागृतीवर जिंदगी मिलेगी फिर से दोबारा या लघुपटाचे सादरीकरण करण्यात आले. शहरातील डॉक्टर, केमिस्ट बांधव, विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी या शॉर्ट फिल्मचा आनंद घेऊन टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. तर गरजूंना नवजीवन देणाऱ्या अवयवदान चळवळीला अधिक गती देण्याचा संकल्प व्यक्त केला.



दीपक पापडेजा कृत-लघुपट प्रीमियर नगरकरांसाठी कल्याण रोड येथील आयएमए हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन फेडरेशनचे संस्थापक पुरुषोत्तम पवार, उपाध्यक्ष सुनील देशपांडे (पुणे), डॉ. कामाक्षी भाटे (रोटो विभाग, के. ई.एम. हॉस्पिटल, मुंबई) या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून आणि विझलेला दिवा पुन्हा नव्याने पेटवून करण्यात आले. या शॉर्ट फिल्मच लेखन दिग्दर्शक दिपक पापडेजा, छायाचित्रण व संकलन समीर तांबोळी, पार्श्वगीत दत्ता पवार व दीपक पापडेजा, पार्श्व संगीत बाळकृष्ण जगताप, संगीत संयोजक यश पवार यांनी केले आहे. यामध्ये कलाकार म्हणून डॉ.अंकुश सुद्रिक, गौरी सुद्रिक, प्रकाश मुनोत, कांचन पापडेजा, दिपक पापडेजा, संतोष शिंदे, सोनाली मुनोत, पुरुषोत्तम उपाध्ये, सतीश अहिरे, सुनील शिंदे, क्षितिज पापडेजा, दादासाहेब मडके, सत्यम शिंदे, कृषी देसले, हर्षल नागापुरे आदींनी उत्तम भूमिका पार पाडल्या.

नगर शाखेचे समन्वयक दिपक पापडेजा यांनी अहिल्यानगर फ ेडरेशनचे कार्य सांगत प्रास्ताविक केले. जिल्हाशासकिय रुग्णालयाचे जिल्हा नेत्रदान समुपदेशन सतिष आहिरे यांप्रसंगी बोलतांना म्हणाले की, मरणोत्तर नेत्रदानाने दोन अंधांच्या जीवनाची चैतन्यमय पहाट होते, जिवंतपणी रक्तदान, जाता जाता अवयवदान व मरणोत्तर नेत्रदान-देहदान करण्याचे त्यांनी आवाहन केले. नोबेल हॉस्पिटलचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. बापूसाहेब कांडेकर (कार्डिओलॉजिस्ट) यांनी अवयव दान विषयक या शॉर्ट फिल्मला शुभेच्छा देत अवयवादानाची चळवळ नगर जिल्ह्यात उत्तमपणे राबविणाऱ्या फेडरेशनच्या नगर शाखेचे कौतुक केले. के.ई.एम. हॉस्पिटल मुंबई येथील रोटो विभागाच्या डॉ. कामाक्षी भाटे यांनी यांनी अवयवदान चळवळ काळाची गरज बनली असल्याचे स्पष्ट करुन, या चळवळीसाठी हॉस्पिटल व समन्वयक टीमच्या भूमिकेबद्दल मार्गदर्शन केले. फेडरेशनचे उपाध्यक्ष डॉ. सुनील देशपांडे (पुणे) यांनी फ ेडरेशने बनवलेल्या क्यूआर कोड, स्कॅन कार्ड, माहिती पुस्तिका याबाबत सर्वांशी संवाद साधला. अवयवदानासाठी सर्वांनी एकजुटीने पुढे यावे असे कळकळीचे आवाहन केले. फेडरेशनचे संस्थापक पुरुषोत्तम पवार यांनी हसता-हसता डोळ्यांच्या पापण्या पाणवणाऱ्या सुनिता ताईंचा संघर्षमय जीवन प्रवास उलगडला. जीवंतपणी कोणाला अवयावांची गरज पडू नये, आणि मृत्युनंतर कोणी शरीरातील मौल्यवान अवयवांची राख करू नये. जिंदगी मिलेंगी फिरसे दोबारा शॉर्ट फिल्म अवयवदान जागृतीला नवा प्रकाश देणारी ठरणार असल्याचे सांगून, त्यांनी गरजवांतासाठी अवयवदान करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमास नगर आयएमए संघटना प्रमुख डॉ. शर्मा, जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे संजय गुंदेचा, एमएसएमआरए चे राज्य सचिव सिध्देश्वर कांबळे, मोबाईल रिटेलेर असोसिएशनचे महाराष्ट्र अध्यक्ष अजित जगताप, सांगळे हॉस्पिटलचे डॉ. सांगळे, डॉ.संजकुमार लड्ढा, डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.मुस्कान तलरेजा, डॉ.कलमेश तलरेजा, दासरी, भूषण देशमुख, डॉ.अशोक गवित्रे, राज गिरी, डॉ.मॉरिस पारधे, राजु गोर्डे, सुनिता थोरात, बाळकृष्ण जगताप, दत्ता पवार, भारत बागरेचा, रामचंद मेंघानी, एस.एल. देडगावकर, अतुल डागा, दिनेश भाटिया, दिपक पापडेजा आदी उपस्थित होते. या उपक्रमासाठी जिल्हा रुग्णालय, पंजाबी युथ ऑर्गनायझेशन, घर घर लंगर सेवा, अहमदनगर सिंधी एज्युकेशन सोसयटी, सावेडी उपनगर व्यापारी असोसिएशन, सराफ, तिरंगा फाउंडेशन, साई फिल्म आर्ट्स असोसिएट, अनाम प्रेम, स्नेहालय आदी संस्थांनी सहयोग दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी सुद्रिक व कांचन पापडेजा यांनी केले. आभार सोनाली मुनोत यांनी मानले.

# केवायसी फसव्या लिंकपासून खातेधारकांना सावधानतेचा इशारा

**अहमदनगर । प्रतिनिधी**



ऑनलाईन केवायसी करण्याच्या नावाखाली खातेदारांना मोबाईच्या व्हॉट्सअपवर लिंक पाठवून फसवणुकीचे प्रकार होत असताना ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशनच्या वतीने सर्व खातेदारांना सूचित केले आहे की, कुठल्याही परिस्थितीत या फसव्या लिंकवर क्लिक करू नये. या घटनांवरुन असे निदर्शनास आले आहे की, बँकेचे विविध खातेदार काही घोटाळेबाजांच्या जाळ्यात अडकत आहेत. हे घोटाळेबाज व्हाट्सअपवर बँकेचे बोधचिन्ह वापरून संदेश पाठवत आहेत आणि त्यात एक लिंक पाठवून खातेदारांना केवायसी अपडेट करण्याचे आवाहन करत आहेत.

या फसवणूककारक लिंकवर क्लिक केल्यामुळे खातेदारांची खाती सायबर घोटाळ्याचे शिकार होऊन त्यांची रक्कम चोरीला जात आहे. बँक कोणतीही लिंक पाठवत नाही आणि केवायसी प्रक्रिया ऑनलाइन करीत नाही. खातेदारांना बँकेच्या याप्रकारच्या फसवणुकीपासून दूर राहण्यासाठी सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जर अशा प्रकारची घटना घडल्या तर खातेदारांनी त्वरित बँकेच्या संपर्कात येऊन तसेच जवळच्या पोलीस सायबर सेलशी संपर्क साधण्याचे म्हंटले आहे. ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी, देविदास तुळजापूरकर यांनी या संदर्भात खातेदारांना जागरूक करण्यासाठी प्रसिध्दीपत्रक काढले आहे. याबाबत काही मार्गदर्शन हवे असल्यास (२०१४.) या ईमेलद्वारे संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# देहरे उपसरपंच डॉ. जाधव यांना पीएचडी प्रदान

## राजकारण करताना भूगोल विषयातील अभ्यासात मिळवली डॉक्टरेट

**नगर तालुका । राहुल जाधव**

देहरे गावचे उपसरपंच डॉ. दीपक नाना जाधव यांना नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने भूगोल विषयातील पीएचडी (विद्यावाचस्पती) ही पदवी बहाल करण्यात आली. डॉ. दीपक जाधव यांनी इम्पॅक्ट ऑफ अग्रिकल्चरल चेंजेस ऑन द रुरल लॅंडस्केप ऑफ अहमदनगर (अहिल्यानगर) डिस्ट्रिक्ट, महाराष्ट्र (१९९१-२०११) या विषयावर शोधनिबंध सादर केला आहे. त्यांना यासाठी आनंदराव धोंडे (अलियास बाबाजी महाविद्यालय, कडा ता. आष्टी) येथील डॉ.माधव राजपांगे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. दीपक जाधव हे सध्या अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे रेसिडेन्सीअल कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत आहेत. तसेच ते देहरे गावचे विद्यमान उपसरपंच आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रा.ह. दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सेक्रेटरी ॲड. विश्वासराव आठरे , सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, जेष्ठ विश्वस्त जी. डी. खानदेशे, सदस्य दीपक दरे, प्राचार्य विजय पोकळे, उपप्राचार्य दादासाहेब वांडेकर, पर्यवेक्षिका वैशाली दारकुंडे, दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष काशिनाथ पाटील सुलाखे, जिल्हाध्यक्ष सुनील चांदणे, शिवाजी लांडगे (मा. चेअरमन पतसंस्था), मा. सरपंच सुभाष खजिनदार, मा.जि.प. सदस्य बाबासाहेब गायकवाड, संजय शिंदे, अंबादास काळे, अरुण लांडगे, व्ही.डी. काळे, रमेश पाटील काळे, शिक्षक नेते आप्पासाहेब शिंदे, भाऊसाहेब काळे, रमेश काळे, बाळासाहेब निमसे, सरपंच कल्याणी धनवटे, ताराबाई करंडे, भानुदास भगत, नंदकुमार साळवे, राहुल जाधव, सुनिल बालवे, डॉ. अनिल लांडगे, संजय लांडगे, रघुनाथ जाधव, रोहीदास जाधव, विठ्ठल पठारे, नवनाथ जाधव, नवनाथ वाघमारे, डॉ. सुनिल जाधव, डॉ. नरेंद्र वाव्हळ, डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. रामदास टेकाळे, किशोर जाधव, बाळासाहेब बोरुडे, प्रा. किरण सोळसे, योगेश सोळसे, शिरीष टेकाडे यांनी अभिनंदन केले आहे.



डॉ. दिपक जाधव यांनी गावातील अनेक प्रश्नांवर आंदोलन करुन ते मार्गी लावली आहेत. भूगोल, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास या चार विषयात त्यांनी एम.ए. पूर्ण केले असून, ते यापूर्वीच सेट व नेट या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांना मिळालेल्या पीएचडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**

परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

८८८८३४७४११

निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टींग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी

फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स

राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.

(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०

ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

जगदंबा टी सेंटर

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर

शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे

97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# आपल्या पाल्यांची तुलना इतर मुलांशी करू नका- डॉ. भोसले

## संजीवनी अकॅडमीच्या प्राथमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंम्मलन संपन्न

**कोपरगांव । किसन पवार**

आपली पाल्ये गुणी आहेत. त्यांच्या प्रगतीच्या बाबतीत काही कमी असेल तर शिक्षकांशी संवाद साधुन अधिकची प्रगती कशी साधता येईल याचा प्रयत्न करावा. मात्र त्यांची तुलना इतर मुलांशी कधीही करू नका. आपण कठीण परीश्रमाने सध्याच्या परीस्थित आला आहात. त्यांच्या पुढे परीश्रमाचा आदर्श ठेवा व त्यांच्यावर होत असलेल्या शैक्षणिक खर्चाचा हिशेब त्यांच्या समोर मांडू नका, असा सल्ला अमेरिकन सायकॉलॉजिकल असोसिएशनच्या सदस्या, लेखिका, मानसशास्त्राच्या प्राध्यापिका, प्राचार्या डॉ. सुषमा भोसले यांनी दिला.



संजीवनी अकॅडमीच्या प्राथमिक विभागाच्या वार्षिक स्नेहसंम्मेलनात प्रमुख पाहुण्या म्हणुन डॉ. भोसले बोलत होत्या. यावेळी संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे, स्कूलच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे, निकिता कोल्हे, हेड ऑफ अकॅडमिक गव्हर्नन्स डॉ. आर. एस. शेंडगे , हेड ऑफ इन्स्टिटयूट सर्विस प्रकाश जाधव, एक्झिक्युटिव्ह प्राचार्य रेखा पाटील, प्राचार्या शैला झुंजारराव, आदी उपस्थित होते. पालकांची उपस्थिती उल्लेखनिय होती. प्रारंभी प्राचार्या झुंजारराव यांनी वार्षिक अहवाल सादर करत विद्यार्थ्यांनी वर्षभर विविध क्षेत्रात स्थापित केलेल्या कीर्तिमानांबद्धल पालकांकडून टाळ्यांचा वर्षाव मिळविला. डॉ. भोसले पालकांना मार्गदर्शन करताना पुढे म्हणाल्या की, आपल्या मुलांचे वागणे हे आपल्या वर्तणुकीचे प्रतिबिंब असते. म्हणुन बोलणे आणि कृती यांच्यात समन्वय ठेवावा. मुलं अनुकरणिय असतात. त्यांना चांगला माणुस बनविण्यासाठी प्रथम तुम्ही चांगला माणुस बना.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमावर व्यक्त होताना त्यांनी चिमुरड्यांचे कौतुक केले, तसेच शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीचेही अभिनंदन केले. अमित कोल्हे म्हणाले की संस्थेचे संस्थापक स्व. शंकरराव कोल्हे यांच्या मार्गदर्शनातून २०१२ साली अगदी थोड्या विद्यार्थी प्रवेशातून स्कूलची वाटचाल सुरू झाली व आज भरगच्च प्रवेश क्षमतेसह अगदी राष्ट्रीय पातळीवर देखिल आपले विद्यार्थी विजयश्री खेचुन आनतात, यात पालकांनी टाकलेला विश्वास महत्वपुर्ण आहे. संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे यांची ग्रामीण मुलांना कोणत्याही अद्ययावत ज्ञानाची कमतरता पडली नाही पाहीजे, अशी तळमळ असते. त्यानुसार नितिन कोल्हे व संचालीका डॉ. कोल्हे यांच्या संकल्पनेतुन तयार केलेल्या कृती आराखड्यानुसार स्कूलची वाटचाल सुरू आहे. यानुसार दैनंदिन कामकाजामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा अंतर्भाव करण्यात आला आहे. सध्या यानुसार कोडींग, रोबोटिक्स विद्यार्थ्यांना शिकविण्यात येत असुन पुढील वर्षापासून आर्टिफीशियल इंटिलिजंस शिकविण्यात येणार आहे. तसेच पाया प्रशिक्षणही देण्यात येणार आहे.

इ. १० वी व इ.१२ वीचे शिक्षण पुर्ण केल्यावर पुढील शैक्षणिक वाटा कोणत्या निवडाव्या, याचा पालक व विद्यार्थी यांच्यापुढे मोठा प्रश्न असतो. याचे उत्तर शोधण्यासाठी संजीवनी विद्यापीठाने नेमलेले करीअर कौन्सेलर स्कूलमध्ये येतात. पालकांनी आपल्या पाल्यांबाबत कोणतीही काळजी करू नये, संजीवनी अकॅडमीचे विद्यार्थी भविष्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकावे, असे व्यवस्थापनाचे प्रयत्न असुन ते सत्यात येईल, असा आशावाद कोल्हे यांनी व्यक्त केला. यावेळी विध्यार्थ्यांनी साहसी, थरार, शास्त्रीय , गायन, अशा संकल्पनांवर सादरीकरण केले. तसेच गीतांसाठी लागणारी सर्व संगीताची वाद्ये चिमुरडयांनीच वाजुवन उपस्थितांची मने जिंकली. व्यावसायिक रंगभूमीला साजेसा रंगमच, उत्कृष्ट ध्वनी व्यवस्था व लाईट इफेक्टस्, भव्य आसन व्यवस्था, विध्यार्थ्यांनीच सादर केलेल्या संगीतमय रचना, नृत्य, इत्यादींना रसिक प्रेक्षकांकडून प्रत्येक सादरीकरणानंतरची दाद, मराठी, हिंदी आणि अस्खलित इंग्रजी मधुन विध्यार्थ्यांनीच केलेले सुत्रसंचालन, या सर्व बाबींमुळे सांस्कृतिक कार्यक्रम संस्मरणीय ठरला, असे मत उपस्थित पालकांनी व्यक्त केले.

# रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, गड संवर्धन, स्वच्छतेने संभाजी महाराज बलिदान सप्ताहाची सांगता

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

गुरुवर्य श्री. संत मनोहर मामा भोसले महाराज यांच्या संकल्पनेतुन मराठा क्रांती ठोक मोर्चा महाराष्ट्र राज्य समन्वयक छत्रपती प्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष धनाजी साखळकर यांच्या मार्गदर्शनाखाली बलिदान दिन सप्ताह समितीच्या वतीने साम्राज्य संरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिना निमित्त धर्मवीरगड (बहादूरगड) मौजे पेडगाव ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर या ठिकाणी ता. २६ मार्च २०२५ ते २९ मार्च२०२५ बलिदान दिन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज



यांच्या बलिदानाची आठवण, माहिती, विचारांचा व इतिहासाचा जागर करणे व शंभु राजांच्या कार्यला उजाळा देणे हा यामागचा हेतु असुन पुढील पिढी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या प्रमाणे निर्माण व्हावी यानिमित्त रक्तदान शिबीर, वृक्षारोपण ,गड संवर्धन स्वच्छता अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.बलिदान सप्ताह समितीच्या वतीने दरवर्षी पिढयानपार बलिदान सप्ताहाचे आयोजन करणार आहोत. वडु बुद्रुक प्रमाणेच धर्मवीर गडाला महत्व आहे.

धर्मवीर गडावर अखंड ज्योत प्रज्वलित रहावी यासाठी धर्मवीर गडावर शौर्य स्तंभ उभा करावा व छत्रपती संभाजी राजांचे स्मारक व्हावे. पंचक्रोशीतील जनतेने बहादुर गडाला धर्मवीर गड असे नाव ठेवलेले आहे म्हणून शासनाने जी आर काढुन बहादुरगडाचे नाव धर्मवीर गड असे करावे. अशा आमच्या शासनाकडे मागण्या असुन त्या त्वरीत मान्य कराव्यात अन्यथा आम्हाला जनआंदोलन करावे लागेल. तरी आम्हाला आंदोलन करण्याची वेळ येऊ देऊ नये असा विनंती वजा इशारा शिवशंभो प्रेमीच्यावतीने देतो असे बलिदान सप्ताह समितीचे अध्यक्ष धनाजी साखळकर यांनी सांगितले. यावेळी हजारो यूवकांनी रक्तदान करुन शंभु भक्ती दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे शक्ति आणि भक्तीचा संगम झाला. या कार्यक्रमासाठी टायगर ग्रुप चे राष्ट्रीय अध्यक्ष तानाजी जाधव व समस्त टायगर ग्रुप यामध्ये सहभागी झाले होते.

## श्रीरामपूर शाळेत संजीवन पॅटर्नचा डंका

### मुले वाचतात इंग्रजी फाडफाड

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसीय कृती आराखड्याअंतर्गत संजीवन इंग्रजी वाचन या उपक्रमाचा समावेश करण्यात आला आहे. श्रीरामपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर नगरपालिकेचे प्रशासनाधिकारी संजीवन दिवे यांनी हा उपक्रम नगरपालिकेच्या ९ शाळामध्ये राबवून त्याचे प्रात्यक्षिक श्रीरामपूर नगरपालिकेच्या लोकमान्य टिळक वाचनालयात घेण्यात आले. मुलांचे वाचन पाहून मुख्याधिकारी यांनी प्रशासनाधिकारी संजीवन दिवे व पालिकेतील मुख्याध्यापक व शिक्षक यांचें कोतुक केले. मुलांमधील इंग्रजी या विषयांची भिती कमी होण्यास निश्चित मदत होणार आहे. या उपक्रमामुळे पालक वर्गात आनंदाने वातावरण निर्माण झाले आहे पालिका शाळांमध्ये पालकांचा पाल्यांना दाखल करण्यासाठीचा ओढा तयार होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाची विभागीय पातळीवर नोंद घेण्यात आली असून शासनाच्या १० उपक्रमात नोंद घेण्यात आली आहे.


## जाहीर प्रगटन

**तमाम लोकांना कळविण्यात येते की,**

खालील परिशिष्ठात वर्णन केलेली मिळकत ही तिचे विद्यमान मालक १) विष्णु भाऊसाहेब भालसिंग २) सुवर्णा विष्णु भालसिंग ३) बाबासाहेब जिजाबा भालसिंग ४) राजेंद्र जिजाबा भालसिंग ५) रविंद्र शहादेव गवळी ६) संजवणी वसंतराव भालसिंग ७) सुष्मिता उमेश भालसिंग ८) कोमल योगेश भालसिंग ९) प्रदिप भाऊसाहेब शेळके १०) मोहन बाबुराव गवळी ११) मिरा नवनाथ शेळके १२) गणेश हनुमान शेळके १३) मच्छिंद्र विट्ठल शेळके १४) अन्वेश मच्छिंद्र शेळके सर्व रा. वाघोली ता. शेवगाव जिल्हा आहिल्यानगर. यांची मालकी वहिवाटीची प्रत्यक्ष ताब्यात असुन त्यांचे नावाची नोंद महसुल दप्तरी मालक सदरी करण्यात आली आहे. सदर मिळकत ही लिज करीता वकिला मार्फत शोध अहवाल करणे कामी सदरची नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदरची मिळकत ही पुर्णपणे निर्वेध निजोखमी अशी आहे असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. तरी सुध्दा सदर मिळकतीवर बैंक ऑफ़ महाराष्ट्र, सेंट्रल बैंक ऑफ़ इंडिता, भारतीय स्टेट बैंक व विकास सेवा सोसायटी याचे कर्ज व्यतीरिक्त करार, मुखत्यारपत्र, साठेखत, इसारपावती अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार ताबा वहिवाट असलेस त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसात त्यांच्या जवळ असणारे त्यांचे हक्काचे कागदपत्रासह आमच्या ऑफिसमध्ये येवुन त्यांच्या हक्का बाबत आमची खात्री करुन द्यावी तोंडी तक्रार चालणार नाही. सदर मुदतीत कोणीही न आल्यास सदर मिळकत ही पुर्णपणे निर्वेध आहे तसेच सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही प्रकारचा हक्क अधिकार असल्यास तो त्यांनी जाणीव पुर्वक सोडुन दिला आहे. असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील मग कोणासही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ठ**

डि. आहिल्यानगर सब डि. तालुका शेवगाव पैकी मौजे वाघोली येथील १) विष्णु भाऊसाहेब भालसिंग गट नं ३३३/१, ३३३/२. २) सुवर्णा विष्णु भालसिंग गट नं ३३२/१ ते ३३२/४. ३) बाबासाहेब जिजाबा भालसिंग गट नं ३३१. ४) राजेंद्र जिजाबा भालसिंग गट नं ३३१. ५) रविंद्र शहादेव गवळी गट नं ३३६/१/अ. ६) संजवणी वसंतराव भालसिंग गट नं ३३४/२/३. ७) सुष्मिता उमेश भालसिंग गट नं ३४३/२. ८) कोमल योगेश भालसिंग गट नं ४४३/२. ९) प्रदिप भाऊसाहेब शेळके गट नं ३०२. १०) मोहन बाबुराव गवळी गट नं ३३६/ब ११) मिरा नवनाथ शेळके गट नं ३३७. १२) गणेश हनुमान शेळके गट नं ३३७. १३) मच्छिंद्र विट्ठल शेळके गट नं ३०१/१/१/२/३. १४) अन्वेश मच्छिंद्र शेळके गट नं ३०१/१/१/२/३. येणे प्रमाणे या मिळकती त्यामधील सर्व तदंगभुत वस्तुसह काहीएक राखुन न ठेवता.

**ता. २८/०३ /२०२५**

**कळावे ही जाहीर नोटीस**

**अमोल लक्ष्मीकांत वेलदेकर**
ॲडव्होकेट ॲण्ड नोटरी पब्लिक
शेवगाव, ता. शेवगाव जि.अहमदनगर

**ऑफिस पत्ता**
माळीगल्ली, वेलदेवाडा, शेवगाव
ता. शेवगाव, जि. अहमदनगर
मो. ९८५०९६९५६१


# दैत्यनांदूर ग्रामस्थांची भगवानगडाला १ कोटी ६२ लाख रुपये देणगी जाहीर

**राजेंद्र देवढे । पाथर्डी**

श्री क्षेत्र भगवानगडावरील, श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या नियोजित मंदिरासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गापैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ. श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.



श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री. नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचा निर्धार केला आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री. नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे दैत्यनांदूर (ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही १ कोटी ६२ लाख रुपये झाली. नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.


## कागदपत्रे हरवले आहे

**प्रिती सुरेश मगरे,**
**रा. लक्ष्मीनगर, शेवगाव,**
**ता. शेवगाव, जि. अहमदनगर.**

मी श्री. शिवाजी कन्या प्रशाळा, रांजणगाव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर येथे २०१४-२०१५ मध्ये इ. ९ वीत शिक्षण घेत होते. परंतु शेवगाव ते रांजणगाव प्रवासादरम्यान माझे कागदपत्रांची फाईल गहाळ झाली आहे. त्यात माझा शाळा सोडल्याचा दाखला होता. तरी माझी कागदपत्राची फाईल कोणास सापडली असेल तर त्यांनी माझ्याशी संपर्क साधून कृपया ती मला परत करावी.

आपली नम्र
**प्रिती सुरेश मगरे**
लक्ष्मीनगर, ता. शेवगाव, जि. अहमदनगर




# छत्रपती संभाजीराजेंनी आपल्या शौर्य, पराक्रमाने इतिहासात ठसा उमटविला- मुरकुटे

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजीराजे यांनी छत्रपती शिवरायानंतर समर्थपणे स्वराज्याचे रक्षण केले. स्वराज्य व धर्मरक्षणासाठी त्यांनी बलिदान दिले.

मृत्यूलाही न डगमगता त्यांनी धर्मरक्षक म्हणून केलेले कार्य कधीच विसरता येणार नाही. छत्रपती संभाजीराजेंनी आपल्या शौर्य व पराक्रमाने इतिहासात आपला ठसा उमटविला, असे प्रतिपादन अशोक कारखान्याचे चेअरमन माजी आ. भानुदास मुरकुटे यांनी केले.

लोकसेवा विकास आघाडीच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी करण्यात आली.

याप्रसंगी छ.संभाजी महाराज यांचे प्रतिमेस मुरकुटे यांनी पुष्पहार अर्पण करुन उपस्थितांनी अभिवादन केले. यावेळी अशोक बँकेचे चेअरमन ॲड सुभाष चौधरी, अशोक कारखान्याचे संचालक निरज मुरकुटे, लोकसेवा विकास आघाडीचे शहराध्यक्ष नाना पाटील, मार्केट कमिटी संचालक किशोर बनसोडे, कारेगाव भाग कंपनीचे संचालक भगवान सोनवणे, नारायणराव बडाख, गणेश छल्लारे, प्रविण फरगडे, संदीप डावखर, कैलास भागवत, रोहित मालकर, अरुण भराडे, विशाल धनवटे, बाळासाहेब शिंदे, प्रमोद करंडे, दत्तात्रय पवार, जब्बार पठाण, शिवनाथ आव्हाड, दादासाहेब गोरे, बाळासाहेब मोरगे, गणेश थोरात, पंकज देवकर आदी उपस्थित होते.

# अवैध धंदे तात्काळ बंद करा; अन्यथा पोलीस ठाण्यासमोर उपोषण

## स्वाभिमानी शेतकरी संघटना व शरद पवार राष्ट्रवादी किसान सेलचे शेवगाव पोलीस निरीक्षकांना निवेदन

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव शहरातील चोरी तसेच अवैध गुटखा, दारू, मटका, आयपीएल सट्टा हे शहरातील अवैध धंदे तत्काळ बंद करा ! अशी मागणी शुक्रवार ता. २८ रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटना व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार किसन आघाडी च्या वतीने शेवगाव पोलीस निरीक्षक समाधान नागरे यांना करण्यात आली. शेवगाव पोलीस निरीक्षक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेवगाव शहरामध्ये अवैध धंद्याचा सुळसुळाट झालेला आहे. त्याची कुठलीही दखल शेवगाव पोलीस घेत नाहीत. तसेच तक्रारदाराला योग्य वागणूक दिली जात नाही. मोठ्या आर्थिक तडजोडी करून छोट्या-मोठ्या चोऱ्या करणाऱ्यांना पोलीस कर्मचारी सोडून देत आहेत. याची दखल शेवगाव पोलीस निरीक्षक यांनी घ्यावी अशी मागणी करण्यात आली.



या निवेदनावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे किसान सेलचे जिल्हाध्यक्ष शरद शिंदे, ज्येष्ठ नेते मच्छिंद्र आर्ले, जिल्हा उपाध्यक्ष दत्ता फुंदे, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे, तालुका अध्यक्ष प्रशांत भराट, मेजर अशोक भोसले, शहराध्यक्ष अमोल देवढे, मच्छिंद्र डाके, अंबादास भागवत, दादा पाचरणे, पठाण करीमिया, सुनील देसरडा, माऊली धनवडे इत्यादींच्या सह्या आहेत. याचा योग्य तो तपास झाला नाही तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे च्या वतीने आठ दिवसानंतर कोणत्याही क्षणी शेवगाव पोलीस स्टेशन समोर आमरण उपोषण करण्यात येईल. असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे यांनी दिला आहे.

**गांजा विकणाऱ्यांना पोलिसांकडून अभय... गांजा पिकवणारा मात्र जेरबंद!**

**दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की आज प्रत्येक गावामध्ये गांजाची सभस विक्री चालू आहे. गांजा पिकवणाऱ्या शेतकऱ्याला पोलीस जेरबंद करतात परंतु गांजा विकणाऱ्यांना मात्र पोलीस अभय देतात. गांजाचे प्रकरणांमध्ये शेतकऱ्याला माफीचा साक्षीदार करून त्याची सुटका करावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली.**

# ट्रॅजेडी क्वीन मीनाकुमारी

हिंदी चित्रपट सृष्टीतील ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांचा आज स्मृतिदिन. मीना कुमारी यांचा जन्म १ ऑगस्ट १९३२ रोजी एका सुन्नी मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव मेहजबिन असे होते. कलेचा वारसा त्यांना कुटुंबातूनच मिळाला. त्यांचे वडील अली बक्ष हे चित्रपट आणि पारशी रंगभूमीवरील कलाकार होते. आई इकबाल बानू या प्रसिद्ध नृत्यांगना होत्या. कामिनी या नावाने त्या अभिनयही करत. मीना कुमारी या चार वर्षाच्या असतानाच त्यांनी अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. लेदर फेस नावाच्या चित्रपटात त्यांनी बाल कलाकार म्हणून काम केले. त्यांनी जवळपास २० चित्रपटात बाल कलाकार म्हणून काम केले. वयाच्या १४ व्या वर्षी बच्चो का खेल या चित्रपटात त्यांनी नायिका म्हणून भूमिका केली. त्या काळात नर्गिस, नूतन, निम्मी या आघाडीच्या अभिनेत्री चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवत होत्या.



मीना कुमारी यांनीही दमदार अभिनयाद्वारे त्यांच्यात स्थान मिळवले आणि लवकरच त्याही आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. कमाल अमरोही दिग्दर्शित महल हा त्यांचा चित्रपट खूप गाजला. पुढे कमाल अमारोही यांनी मीना कुमारी यांना घेऊन अनारकली नावाचा चित्रपट बनवण्याची घोषणा केली . या चित्रपटाचे शूटिंग सुरू असतानाच मीना कुमारी यांना अपघात झाला त्यात त्यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली. यावेळी कमाल अमारोही त्यांना नियमित भेटायला येत त्यातूनच त्यांचे प्रेम जमले. आर्थिक अडचणीमुळे हा चित्रपट पूर्ण होऊ शकला नाही मात्र दोघांमधील प्रेम वाढत गेले. कमाल अमारोही मीना कुमारी यांना मंजू म्हणत तर मीना कुमारी कमाल अमारोही यांना चंदन नावाने संबोधत असे. दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला तरी घरच्यांच्या संमती शिवाय लग्न करण्यास मीना कुमारी तयार नव्हत्या. मात्र कमाल अमारोही यांनी खुप आग्रह केल्याने त्यांनी लग्न केले. त्यांच्या लग्नाची बातमी त्यांच्या वडिलांना समजल्यावर ते खूप संतापले. त्यांनी दोघांच्या भेटीवर बंधने आणली. कमाल अमारोही यांनी मीना कुमारी यांना घेऊन डेरा नावाचा चित्रपट काढण्याची घोषणा केल्यावर वडील अली बक्ष यांनी मेहबूब यांच्या अमर नावाच्या चित्रपटात काम करण्यासाठी मीना कुमारी यांच्यावर दबाव आणला. चार पाच दिवसांचे शूटिंग झाल्यावर त्यांनी तो चित्रपट सोडला व थेट आपल्या नवऱ्याकडे म्हणजे कमाल अमारोही यांच्याकडे गेल्या. कमाल अमारोही यांचे पहिले लग्न झाले होते व त्यांना पहिल्या पत्नीपासून तीन अपत्येही होते. त्यामुळे मीना कुमारी यांची तीव्र इच्छा असतानाही मीना कुमारी यांना मूल होऊ न देण्याचा निर्णय त्यांच्याकडून तिच्यावर लादला गेला. मीना कुमारी यांच्या कौटुंबिक जीवनात इतकी उलथापालथ होत असताना त्यांचे चित्रपट मात्र यशस्वी होत होते. एक ही रास्ता, दिल अपना प्रीत पराई, दायरा, परिणिता, दिल एक मंदिर, शारदा, साहब बीबी और गुलाम, फुल और पथर हे त्यांनी अभिनय केलेले उल्लेखनीय चित्रपट. मीना कुमारी या फिल्म फेअर पुरस्कार मिळवलेल्या पहिल्या अभिनेत्री आहेत . १९५३ साली त्यांना बैजू बावरा साठी तर पुढील वर्षी म्हणजे १९५४ साली परिणितासाठी देखील फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. साहब बीबी और गुलाम तसेच काजल या चित्रपटातील भूमिकांसाठीही त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला आहे. मीना कुमारी या जितक्या चांगल्या अभिनेत्री होत्या तितक्याच चांगल्या कवियत्री देखील होत्या. नाझ या नावाने त्यांच्या काही उर्दू रचना प्रकाशित झाल्या आहेत. त्यांचा आवाजही गोड होता. मधुबाला यांना त्यांचा आवाज खुप आवडायचा. त्यांच्या यशाचा आलेख जसा उंचावत गेला तसा कमाल अमरोही यांचा हेवा वाढत गेला. मीना कुमारी यांनी अभिनय सोडून द्यावा यासाठी ते दबाव आणू लागले. मीना कुमारी यांनी अभिनय सोडण्यास नकार दिल्याने दोघांतील तणाव वाढत गेला. पुढे दोघे विभक्त झाले. त्यानंतर धर्मेंद्र यांच्याशी त्यांचे संबंध असल्याचीही चर्चा होती. ते दोघेही एकमेकांच्या प्रेमात बुडाल्याचे अनेक दाखले जुन्या चित्रपट मॅगझीन मधून मिळतात. फुल और पत्थर या चित्रपटानंतर धर्मेंद्र यांनीही त्यांच्यापासून अंतर ठेवण्यास सुरवात केल्यावर त्या व्यथित झाल्या. त्यांची प्रकृती खालावली. डॉक्टरांनी त्यांना रोज एक पेग ब्रँडी घेण्याची सूचना केली. पण एक पेगचे दोन पेग, दोनचे चार पेग असे पेग वाढत गेले. औषध म्हणून सुरू केलेली ब्रँडी लवकरच व्यसनात रूपांतरित झाली. त्या नशेच्या आहारी गेल्या. शूटिंगच्यावेळी, प्रवासात त्यांच्या पर्स मध्ये ब्रँडीची बाटली असायची. साहब बीबी और गुलाम तसेच छोटी बहू या चित्रपटातील भुमीका आपल्या वास्तव जीवनाशी साधर्म्य दाखवणाऱ्या आहेत असे त्या म्हणत. नशेच्या आहारी गेल्याने त्यांची प्रकृती खालावत गेली त्यातच त्यांचे निधन झाले. पडद्यावरील आणि वास्तव जीवनातील साधर्म्य असणाऱ्या ट्रॅजेडी क्वीन ३१ मार्च १९७२ रोजी काळाच्या पडद्याआड गेल्या. ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांना भावपूर्ण आदरांजली.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

# पक्ष वाढीसाठी पूर्ण वेळ देत गावागावात सभासद वाढवू- कॉ. संदीप इथापे



**शेवगाव । प्रतिनिधी**

आताच्या काळात भारतभर कम्युनिस्ट पक्ष हेच एकमेव जनतेसाठी काम करताना दिसत आहेत. देशातील युवक, विद्यार्थी, महिला, शेतकरी, कामगार व सर्वसामान्यांचे प्रश्न घेऊन लोकल ते ग्लोबल सत्ताधारी यांच्याकडे पाठपुरावा करून प्रश्न सोडवत आहेत. हिच परिस्थिती आपल्या जिल्हा व तालुक्यात आहे. जनहिताची खरी कळकळ कम्युनिस्ट पक्षांनाच असल्याचे लोकं अनुभव घेत आहेत. या सर्वांच्या प्रश्नांसाठी आम्ही सर्वजण कटीबध्द असून येत्या काळात शेवगाव तालुक्यात गावागावात पक्ष सभासद वाढवून पक्षाची चांगली बांधणी करण्यात येईल, असे प्रतिपादन कॉम्रेड संदिप इथापे यांनी केले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाची त्रिवार्षिक पक्ष परिषद शेवगाव तालुक्यातील सालवडगाव येथे राज्य सचिव कॉम्रेड सुभाष लांडे, जिल्हा सचिव कॉम्रेड बन्सी सातपुते, प्राचार्य शिवाजीराव देवढे, कॉम्रेड स्मिता पानसरे, कॉम्रेड संजय नांगरे, ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते शशीकांत कुलकर्णी, कॉम्रेड भगवानराव गायकवाड, किसान सभेचे जिल्हा सचिव आप्पासाहेब वाबळे यांच्या उपस्थितीमध्ये पार पडली. शेवगाव तालुकाध्यक्षपदी संदिप इथापे यांची पुनर्निवड करण्यात आली, यावेळी इथापे बोलत होते. यावेळी इथापे यांनी देशभरात आणि राज्यात असलेले धर्मांध व जातीभेदी सरकार लोकांच्या मुळ प्रश्नांकडे दूर्लक्ष व्हावे म्हणून लोकांमधे भेद करत असल्याचे सांगितले. पक्षाचे ज्येष्ठ नेते शशिकांत कुलकर्णी यांच्या हस्ते ध्वजारोहण करून ध्वजगीत घेण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला. बबनराव लबडे, बेबीताई लांडे, विष्णू गोरे यांची अध्यक्ष मंडळ म्हणून निवड करण्यात आली. त्यास बाळासाहेब म्हस्के यांनी अनुमोदन दिले. कॉम्रेड संजय नांगरे यांनी प्रास्ताविक केले. कॉम्रेड वैभव शिंदे यांनी अहवाल वाचन केले. यावेळी उपस्थितांना प्राचार्य शिवाजीराव देवढे,




आप्पासाहेब वाबळे, बन्सी सातपुते, सुभाष लांडे, स्मिता पानसरे यांनी मार्गदर्शन केले. सचिव मंडळातर्फे कॉम्रेड बेबीताई लांडे यांनी आपले विचार मांडले. पक्ष परिषदेसाठी कॉम्रेड बबनराव पवार, कॉम्रेड दत्ता आरे, कॉम्रेड गोरक्ष काकडे, कॉम्रेड बापूराव राशिनकर, कॉम्रेड अंजाबापू गायकवाड, कॉम्रेड अर्जुन खैरे, मुरलीधर काळे, अविनाश बापू गायकवाड, संतोष लहासे, गोवर्धन ससाने, रतन घोडके, भानुदास गणपत लांडे, किशोर तुजारे, संजय तेलोरे, कडू रुईकर, वसंत मगर, विनोद मगर, सुनील हाडके, गोरक्षनाथ आवटी, बाळासाहेब बनसोडे, आत्माराम गिरमकर, विष्णू चव्हाण, भास्कर पांजगे, हरिभाऊ भापकर आदी पक्ष सभासद व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कॉम्रेड भीवा घोरपडे यांनी आभार मानले. शेवगाव तालुक्याची नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. कॉम्रेड संदिप भाऊसाहेब इथापे यांची पुन्हा एकदा शेवगाव तालुका सेक्रेटरीपदी निवड करण्यात आली. तसेच कॉम्रेड वैभव शिंदे, कॉम्रेड भिवा घोरपडे यांची सहसेक्रेटरीपदी निवड करण्यात आली.

# मराठी चित्रपटांची सद्यस्थिती

मार्च महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात चार मराठी चित्रपट प्रदर्शित झाले 'गाव बोलावतो' या चित्रपटात भूषण प्रधान, गौरी नलावडे आणि श्रीकांत यादा मुख्य भूमिकेत आहेत; 'हार्दिक शुभेच्छा हा पुष्कर जोग दिग्दर्शित आणि अभिनित चित्रपट; 'फॉलोअर' हा गणेश शिंदे दिग्दर्शित आणि अवंतिका टिकेकर अभिनीत चित्रपट; तर हर्षद नलावडे लिखित, दिग्दर्शित आणि निर्मित 'आरडी' हा उद्योग क्षेत्रातील वाईट प्रवृत्ती रेखांकित करणाऱ्या चित्रपटांचा यात समावेश आहे. हे चित्रपट प्रतिभासंपन्न असले तरीही, खराब मार्केटिंग, प्रेक्षकांना आकर्षित करणाऱ्या वैशिष्ट्यांचा अभाव आणि अप्रभावी वितरण धोरण यामुळे या चित्रपटांवर अपयशाची छाया पडण्याचा धोका आहे.







या वर्षाच्या पहिल्या तिमाहीत, मराठी चित्रपट उद्योगाने 'फस्क्लास दाभाडे आणि 'संगीत मानापमान हे दोनच यशस्वी चित्रपट दिले. संगीत मानापमान हा एक मोठ्या बजेटचा चित्रपट होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर बरी कामगिरी केली, परंतु दुर्दैवाने त्याचा निर्मिती खर्चही वसूल झाला नाही. चालू वर्षाची ही स्थिती असताना, आपण जर मागच्या वर्षांचा आढावा घेतला तर फुलवंती, धर्मवीर-२, नवरा माझा नवसाचा-२ आणि जुने फर्निचर यांसारख्या काही मोजक्याच मराठी चित्रपटांना यश मिळाल्याचे दिसून येते. मराठी चित्रपटसृष्टीच्या सध्याच्या दुर्दशेमागील कारणांचा आणि सोबतच मार्केटिंगमधील अपयश, उदासीन प्रेक्षक, वितरण आव्हाने तसेच व्यापक सांस्कृतिक संदर्भ यासारख्या समस्यांचा परामर्श घेऊया.

आज मराठी चित्रपटांसमोरील सर्वात गंभीर समस्यांपैकी एक म्हणजे प्रभावी मार्केटिंग धोरणाचा अभाव. इतर चित्रपट उद्योग जेथे चित्रपटाच्या प्रचार मोहिमा प्रदर्शन तारखेच्या आसपास चर्चेची लाट निर्माण करतात, तिथे अनेक मराठी चित्रपट मात्र प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी संघर्ष करत राहतात. सुसंगत मार्केटिंग योजना नसल्यामुळे दर्शकांना हे चित्रपट कधी आणि कुठे प्रदर्शित केले जात आहेत याची माहितीच मिळत नाही. परिणामी, चित्रपट आपली 'हवा' निर्माण करण्यात अयशस्वी ठरतात, आणि मग बॉक्स ऑफिसवरची कमाई देखील यथातथाच असते. उदाहरणार्थ, एकाच आठवड्यात प्रदर्शित होणाऱ्या चार चित्रपटांसाठी त्यांचे अद्वितीय गुण हायलाइट करणाऱ्या वेगवेगळ्या मार्केटिंग योजना तयारच केल्या जात नाहीत. मजबूत मार्केटिंग धोरण राबवत जर प्रेक्षकांना या चित्रपटाची विविध माध्यमांतून सतत आठवण करून दिली तरच चित्रपट पाहण्याची योजना आखताना प्रेक्षकांना हे चित्रपट आठवण्याची शक्यता असते. म्हणूनच मार्केटींगला चित्रपट निर्माते आणि प्रेक्षक यांच्यातील दुवा मानले जाते. मार्केटिंग धोरणामुळेच चित्रपटाच्या प्रदर्शन काळात त्याच्याबद्दल अपेक्षा आणि उत्साह निर्माण करता येऊ शकतो. मार्केटिंग धोरणांनी केवळ पारंपरिक पद्धतींवर लक्ष केंद्रित करून चालणार नाही तर माहौल तयार करण्यासाठी सोशल मीडिया, इन्फ्लुएंसर सोबत भागिदारी आणि सामुदायिक सहभागाचा फायदा घेणे आवश्यक आहे. परस्परसंवादी सत्रे, ट्रेलर आणि स्निक पिक याद्वारे प्रेक्षकांशी संपर्क साधण्यानेच भावनिक बंध आणि चित्रपटाबद्दलची आतुरता वाढू शकते. दुर्दैवाने, मराठी चित्रपटांचे मार्केटिंग फार चांगल्या तऱ्हेने होत नसल्याने अनेक चित्रपटांनी प्रेक्षकांची संख्या वाढवण्याच्या संधी गमावल्या आहेत.आणखी एक महत्त्वाचे आव्हान म्हणजे एकाच आठवड्यात अनेक मराठी चित्रपट प्रदर्शित होणे. त्यामुळे एकाच वेळी अनेक चित्रपट पाहायला जाण्याइतपत मराठी प्रेक्षकवर्ग मोठा आहे का? असा प्रश्न निर्माण होतो. पूर्वीपासूनच मराठी प्रेक्षक दर आठवड्याला एक किंवा दोन चित्रपट पाहण्याला प्राधान्य देतात. मग जेव्हा एकाच वेळी अनेक चित्रपट प्रदर्शित होतात, तेव्हा प्रेक्षकसंख्या आपसूकच कमी होते. याशिवाय बरेचदा प्रेक्षकांकडे अनेक चित्रपट पाहण्याइतके पैसे देखील नसतात. मग, ते सर्वात आकर्षक वाटणाऱ्या चित्रपटांवर खर्च करतात आणि मग इतर चित्रपटांना प्रेक्षक मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. या स्थितीमुळे चित्रपटांमध्ये स्पर्धा सुरू होते आणि मग एखादा चित्रपट इतर सर्व चित्रपटांचे प्रेक्षक खाऊन टाकतो. चित्रपट प्रदर्शनाच्या तारखांसंदर्भात निर्मात्यांमध्ये समन्वयाचा अभाव ही देखील मराठी चित्रपट उद्योगातील एक गंभीर समस्या आहे. चित्रपटांच्या सामूहिक यशासाठी एकता आणि परस्पर संवाद आवश्यक आहे. मात्र मराठी चित्रपट उद्योगात या दोन्ही गोष्टींचा अभाव आहे. याउलट, बॉलिवूड किंवा दक्षिण भारतीय चित्रपटांसारख्या इतर चित्रपट उद्योगांनी बॉक्स ऑफिसवर जास्तीत जास्त चांगली प्रेक्षकसंख्या मिळवण्यासाठी दोन चित्रपटांच्या प्रदर्शन तारखांमध्ये अंतर ठेवण्यासाठी शिष्टाचार स्थापित केले आहेत. अशा प्रकारच्या धोरणात्मक नियोजनाचा मराठी चित्रपटसृष्टीत मोठा अभाव आहे. म्हणूनच यशस्वी ठरू शकणारे मराठी चित्रपट आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या छायेत झाकोळून जातात. यशासाठी एकता आणि धोरणात्मक नियोजन महत्त्वपूर्ण असताना प्रदर्शनाच्या तारखा ठरवण्यासाठी चित्रपट निर्मात्यांमध्ये सहयोगी दृष्टिकोनाचा अभाव, ही बाब उद्योगातील एक महत्त्वपूर्ण तफावत उघड करते.

कोणत्याही चित्रपटाच्या यशामध्ये वितरणाची भूमिका महत्त्वाची असते आणि मराठी चित्रपट उद्योग या क्षेत्रात महत्त्वपूर्ण आव्हानांना तोंड देत आहे. 'हार्दिक शुभेच्छा सारखे चित्रपट पॅनोरमा सारख्या प्रस्थापित संस्थांद्वारे वितरणाचा लाभ घेतात, तर इतर चित्रपट पुरेसे प्रतिनिधित्व मिळण्यासाठी देखील संघर्ष करताना दिसतात. बऱ्याच चित्रपटांचे वितरण कमी प्रसिद्ध कंपन्यांद्वारे केले जाते. अशा कंपन्यांचा चित्रपट उद्योगावर फारसा प्रभाव नसतो. त्यामुळे चित्रपटासाठी प्राइम स्क्रीनिंग वेळा मिळवण्यात अनेक अडचणी येतात. मल्टिप्लेक्समध्ये मराठी चित्रपटांच्या प्रदर्शनासाठी स्क्रीन उपलब्ध नसणे, ही देखील एक गंभीर समस्या आहे. मल्टिप्लेक्समध्ये बऱ्याचदा मराठी चित्रपटाला दुपारच्या गैरसोयीच्या मानल्या जाणाऱ्या वेळात स्क्रीन टाईम दिला जातो. ही वेळ प्रेक्षकांसाठी गैरसोयीची असल्यामुळे त्या खेळाला पुरेसे प्रेक्षक मिळत नाहीत. चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या वेळा आणि प्रेक्षकांची गैरसोय या चुकीच्या बाबींमुळे प्रेक्षकांची संख्या आणखीनच घटते. मराठी चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकाला आपल्या कामाच्या वेळा संपल्यानंतर चित्रपट पाहायला मिळणार नसेल, तर चित्रपट पाहण्यासाठी आवर्जून प्रयत्न करणे हा मराठी माणसाचा पिंडच नाही. शिवाय, वितरण रणनीतीमध्ये केवळ चित्रपट प्रदर्शनाची वेळच नाही तर भौगोलिक उपलब्धता देखील महत्त्वाची आहे. जिथे प्रेक्षकसंख्या जास्त असते अशा शहरी भागातील मल्टिप्लेक्समध्ये अनेक मराठी चित्रपट दाखवलेच जात नाहीत. त्यामुळे संभाव्य प्रेक्षकसंख्या आणखी कमी होते आणि या सर्वाचा परिणाम चित्रपटाच्या बॉक्स ऑफिसवरच्या कमाईवर होतो.



गिरीश वानखेडे
मनोरंजनवार्ता

मराठी सिनेमाची सांस्कृतिक धारणा देखील सध्याच्या स्थितीत महत्त्वाची भूमिका बजावते. मराठी चित्रपट फार पूर्वीपासून आपली कथा मांडणी आणि सांस्कृतिक प्रासंगिकता यासाठी ओळखले जातात. मात्र, आज-काल प्रेक्षकांचा या माध्यमाबद्दलचा अभिमान आणि आदर कमी झाल्याचे दिसून येते. अनेक मराठी कुटुंबे मराठी चित्रपटांपेक्षा इंग्रजी किंवा हिंदी चित्रपटांना प्राधान्य देतात आणि त्याच चित्रपटांना अधिक प्रतिष्ठित मानतात. या सांस्कृतिक पक्षपातामुळे मराठी चित्रपटाचे मूल्य कमी होत आहे. परिणामी, प्रेक्षकांना चित्रपटगृहाकडे आकर्षित करणे मराठी चित्रपट निर्मात्यांसाठी आव्हानात्मक बनत आहे. मराठी चित्रपटसृष्टीत स्टार पॉवर नसल्याबद्दल रितेश देशमुखने केलेले भाष्य या समस्येला आणखी अधोरेखित करते. प्रेक्षकांना आकर्षित करण्यास सक्षम असणारे कलाकार घडवण्यात इतर चित्रपट उद्योगांप्रमाणे मराठी चित्रपटांनी स्टारडमची तुलनात्मक प्रणाली विकसित केलेली नाही. फारसे सुप्रसिद्ध चेहरे नसल्यामुळे मराठी चित्रपट पाहण्याचे आकर्षण कमी होते, कारण प्रेक्षक अनेकदा सुप्रसिद्ध विशिष्ट कलाकाराचा अभिनय किंवा त्याचा स्टारडम अनुभवण्यासाठी चित्रपट पाहायला जात असतात. मराठी चित्रपटाच्या सुवर्णकाळ आठवला की आपल्याला सचिन पिळगावकर, अशोक सराफ, महेश कोठारे आणि लक्ष्मीकांत बेर्डे सारखे सुपरस्टार आठवतात. या कलाकारांनी प्रेक्षकाची नस ओळखून काम केले, त्यामुळे ते घराघरात पोहचले आहेत. या सगळ्यांनी अनेकदा एकत्रित चित्रपट देखील केले आहेत. पण सध्याच्या काळात कलाकारांमधील हे केमिस्ट्री कुठेतरी हरवली आहे आणि स्टार पॉवरच्या कमतरतेमुळे नवीन चित्रपटांना प्रेक्षकांना आकर्षित करणे कठीण झाले आहे. हिंदी किंवा इंग्रजी चित्रपटांच्या तुलनेत मराठी चित्रपट कमी ग्लॅमरस किंवा मनोरंजक असल्याच्या सर्वसाधारण समजामुळे अनेक कुटुंबे मनोरंजनासाठी मराठी चित्रपटाची निवड करण्यास इच्छुक नसतात. या सांस्कृतिक दुरावस्थेमुळे दर्शक मराठी चित्रपटांपासून आणखीनच दूर जात आहेत. परिणामी, अत्यंत कठीण स्पर्धा असलेल्या बाजारात मराठी चित्रपटांना तग धरून राहाणे कठीण जात आहे. नवोन्मेष हे आणखी एक क्षेत्र आहे जिथे मराठी चित्रपट मागे पडत आहे. मराठी चित्रपट पारंपरिक कथा मांडणी शैली आणि पारंपरिक तंत्रावर अवलंबून आहे जे नव्या युगातील प्रेक्षकांना फारसे प्रभावी वाटत नाही त्यामुळे या उद्योगाला काहीसे साचलेपण आले आहे. ताज्या, नाविन्यपूर्ण आशयाची निर्मिती होत नसल्याने हे चित्रपट प्रेक्षकांच्या कल्पकतेचा वेध घेत नाहीत, ज्यामुळे प्रेक्षकही चित्रपट पाहण्याला प्राधान्य देत नाहीत. मराठी चित्रपट पूर्वीपासूनच आशयप्रधान राहीले आहेत, पण नव्या काळाशी सुसंगती साधण्यासाठी आता कथा मांडणीत प्रयोग झाले पाहिजेत आणि कथेत वैविध्य आणण्याची गरज आहे. नवाकोरा विषय असणारे, पठडीबाहेरचे चित्रपट पाहण्याकडे प्रेक्षकांचा कल वाढत असून ही भूक भागवण्यासाठी ते इतर भाषिक चित्रपटांकडे आकर्षित होत आहेत. नाविन्याची कास धरत पारंपरिक कथा मांडणीच्या सीमा ओलांडून यश संपादन करणारे इतर भाषेतील चित्रपटांचे याचे स्मरण करून देतात की स्पर्धात्मक जगात टिकून राहण्यासाठी नाविन्य आवश्यक आहे. चित्रपटात सद्यस्थितीतील समस्यांचा समावेश करणे, शैलींमध्ये प्रयोग करणे आणि अपारंपरिक कथांचा शोध घेणे, याबाबी मराठी चित्रपटात नवीन चेतना निर्माण करु शकतील. चित्रपट निर्मात्यांनी नवोन्मेषाचा स्वीकार करून आधुनिक काळातील प्रेक्षकांशी जुळणाऱ्या आकर्षक चित्रकृती तयार केल्या तर पून्हा एकदा चित्रपटगृहात प्रेक्षकांची रिघ लागेल. डिजिटल व्यासपीठाच्या आगमनाने मराठी चित्रपटांसमोर एकीकडे आव्हान उभे केले, तर दुसरीकडे संधीही सादर केल्या. ओटीटी व्यासपीठावर प्रादेशिक आशयाची मागणी वाढत असताना मराठी चित्रपटांना मात्र अनेकदा कमी प्रतिनिधित्व दिले जाते. डिजिटल व्यासपीठावर तेलगू, तमिळ आणि मल्याळम भाषेतील चित्रपटांची विपुलता वर्चस्व गाजवत असताना मराठी चित्रपटांना मात्र येथे पाय रोवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. नेटफ्लिक्स आणि ॲमेझॉन प्राईम सारख्या प्रमुख ओटीटी व्यासपीठावर मराठी भाषेतील आशयाला प्रतिनिधित्व नसणे यातून एक व्यापक समस्या समस्या समोर येते, ती म्हणजे - चित्रपट हक्कांच्या खरेदीदारांना आकर्षित करण्यात आणि डिजिटल वितरण सौद्यांची सुरक्षितता मिळवण्यात मराठी चित्रपट असमर्थ आहेत. 'प्लॅनेट मराठी' सारख्या मराठीला समर्पित व्यासपीठाचा उदय आणि पतन देखील स्थानिक चित्रपटांना अपेक्षित लोकप्रियता मिळवून देऊ शकले नाही. डिजिटल व्यासपीठावरचा हा भेदभावामुळे दर्शकांना मराठी आशय सहज उपलब्ध होत नाही, आणि मग मराठी चित्रपट निर्मात्यांसमोरील आव्हानात भर पडते. या शिवाय, स्ट्रीमिंग मार्केट अत्यंत स्पर्धात्मक असल्याने प्रभावी मार्केटिंग आणि जाहिरातीशिवाय, मराठी चित्रपट आशयाच्या महासागरात गडप होण्याचा धोका आहे. चित्रपट निर्मात्यांनी प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्मचा प्रभावीपणे उपयोग करून, जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि दर्शकांची संख्या वाढवण्यासाठी सोशल मीडिया आणि जाहिरातींचा वापर करणे आवश्यक आहे. मराठी चित्रपटांचे मल्टिप्लेक्सशी असलेले नाते हा त्याच्या दृश्यमानतेवर आणि यशावर परिणाम करणारा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. बहुसंख्य प्रेक्षक चित्रपट पाहण्यासाठी जेथे गर्दी करतात अशा मल्टिप्लेक्समध्ये पुरेसे स्क्रीनिंग मिळवण्यासाठी अनेक मराठी चित्रपट धडपडत असतात. मोठ्या-बजेटच्या, स्टार-स्टडेड चित्रपटांना प्राधान्य दिले जात असल्याने छोटे मराठी निर्मितीवर त्यांच्या सावलीत झाकून जातात आणि मग ते प्रेक्षकांच्या नजरेतही भरत नाहीत. शिवाय, मराठी चित्रपटांना चित्रपटगृहात दिला जाणार शो टाईम अनेकदा कामकरी वर्गासाठी गैरसोयीचा असतो. मराठी चित्रपटांच्या प्रेक्षकांना कामावरून घरी परतून रात्री ८/९ वाजता चित्रपट पाहायचा असेल, तर त्यांना त्यावेळी मराठी शो उपलब्धच नसतात. त्याऐवजी, मराठी प्रेक्षकांना त्यांच्या कामाच्या वेळापत्रकाशी न जुळणारे शोटाइम दिले जातात, ज्यामुळे प्रेक्षकांची उपस्थिती कमी होत जाते. प्रेक्षक उपलब्धता आणि शोटाइममधील हे चुकीचे गुणोत्तर चित्रपटाच्या बॉक्स ऑफिस कामगिरीवर विपरीत परिणाम करू शकते. चित्रपट निर्माते आणि वितरकांनी स्क्रिनिंगचे नियोजन करताना आपल्या प्रेक्षकांची सोय आणि कामाचे वेळापत्रक यांचा जरूर विचार करावा. मराठी चित्रपटसृष्टीवर परिणाम करणारा एक मूळ मुद्दा म्हणजे मराठी भाषिक लोकांमध्ये सांस्कृतिक अभिमानाचा अभाव. सार्वजनिक मंचांवर मराठी भाषा आणि संस्कृतीच्या महत्त्वावर भर दिला जात असताना, अनेक कुटुंबे आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याला प्राधान्य देतात आणि मराठीपेक्षा हिंदी किंवा इंग्रजी चित्रपट पाहणे पसंत करतात. या सांस्कृतिक पक्षपातामुळे मराठी चित्रपटांचे मूल्य कमी होते आणि प्रादेशिक चित्रपट निर्मितीला प्रोत्साहन देण्याच्या प्रेक्षकांच्या इच्छेवर परिणाम होतो. मराठी चित्रपटांबाबत अभिमानाची भावना वाढवण्यासाठी मराठी चित्रपटांचे सांस्कृतिक महत्त्व वाढवणे आणि चित्रपट उद्योगात मराठी चित्रपटांचे योगदान अधोरेखित करणे आवश्यक आहे. तरुण पिढीमध्ये मराठी चित्रपटांबद्दलच्या कौतुकाला प्रोत्साहन देणारे जागरूकता उपक्रम राबवले तर मराठी चित्रपट उद्योगाबद्दल सर्वसामान्यांच्या मनात अभिमान आणि आपलेपणाची भावना निर्माण होऊ शकते. मराठी चित्रपटसृष्टीची सध्याची स्थिती चिंताजनक आहे, अलिकडच्या वर्षांत केवळ मोजक्याच चित्रपटांनी व्यावसायिक यश मिळवले आहे. मराठी चित्रपटांसमोरची आव्हाने बहुआयामी असून त्यात मार्केटिंगचे अपयश, प्रेक्षकांचा सहभाग, डिस्ट्रीब्युशनमधील समस्या आणि सांस्कृतिक दुरावा यांचा समावेश आहे. चित्रपट निर्माते, वितरक आणि दिग्दर्शक यांच्यासह भागधारकांनी प्रभावी सहयोग करणे आणि धोरण आखणे ही काळाची गरज आहे. एकमेकांच्या सोयीनुसार चित्रपट प्रदर्शिनाच्या तारखांचे वेळापत्रक ठरवणे, मार्केटिंगचे प्रयत्न वाढवणे, नावीन्य स्वीकारणे आणि डिजिटल प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी अधिक एकसंध दृष्टीकोनाचा अवलंब करणे या मार्गांनी मराठी चित्रपट उद्योग प्रेक्षकांच्या ह्रदयात आपले स्थान परत मिळवू शकतो. मराठी चित्रपटात वाढीची जबरदस्त क्षमता आहे, परंतु मराठी चित्रपटसृष्टीचे पुनरुज्जीवन आणि पुनरुत्थान करण्यासाठी सर्व संबंधितांकडून एकत्रित प्रयत्न केले जाणे आवश्यक आहे. अलीकडच्या काही महिन्यांत मराठी चित्रपटांनी केलेल्या सुमार कामगिरीवर विचार केला तर यातून हीच गोष्ट लक्षात येते की मराठी चित्रपटांच्या उज्वल भविष्यासाठी नव्या काळातील संधी ओळखून एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे. सध्या मराठी चित्रपटसृष्टी एका चौरस्त्यावर उभी आहे, जिथे आज घेतलेल्या निर्णयावरच तिचे भवितव्य अवलंबून आहे. या आव्हानांना तोंड देऊन आणि सहकार्य, नावीन्य वाढवून आणि अभिमानाची संस्कृती रुजवून मराठी चित्रपट पुन्हा एकदा भरभराटीला येऊ शकतो तसेच महाराष्ट्रातील आणि बाहेरील प्रेक्षकांची मने जिंकू शकतो.

*(लेखक जागतिक सिनेमा स्तंभलेखक , समीक्षक आहेत)*